सकाळ पु. पा. नं. ३

# मिरा-भाईंदरच्या पाणीपुरवठ्यात वाढ

## आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर एमआयडीसी, स्टेम प्रशासनाला जाग

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : स्टेम प्राधिकरण व एमआयडीसीकडून मंजूर कोट्यापेक्षा कमी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे सर्वपक्षीय मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला होता. आता गेल्या काही दिवसांपासून मिरा-भाईंदरच्या दैनंदिन पाणीपुरवठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



मिरा-भाईंदरला पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरण आणि एमआयडीसीकडून पाणीपुरवठ्यात कपात करण्यात आली होती. त्यामुळे शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली होती. त्यातच एमआयडीसीकडून घेण्यात येणाऱ्या शटडाऊनमुळे, तसेच जलवाहिन्या वारंवार फुटत असल्यामुळे नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर स्टेम, एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना महापालिकेत पाचारण करण्यात आले होते. मिरा-भाईंदरच्या पाणीपुरवठ्यात तातडीने वाढ झाली नाही तर स्टेम आणि एमआयडीसीच्या ठाणे येथील कार्यालयावर मोर्चा काढला जाईल, असा इशारा सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना दिला. त्यानंतर गेल्या चार दिवसांपासून शहराच्या पाणीपुरवठ्यात वाढ झाली आहे.

गेल्या वर्षी देखील पाणी कमी देण्यात येत असल्याबद्दल शहरात आंदोलन केले होते. कोविड काळात हे आंदोलन केल्याने शंभरहून अधिक जणांवर गुन्हा दाखल झाला होता. त्यावेळीही एमआयडीसी, स्टेमच्या अधिकाऱ्यांना महापालिकेत पाचारण करून आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर पाणीपुरवठ्यात वाढ झाली होती. मात्र सहा महिन्यांतच कपात करण्यात आली. त्यामुळे सध्या झालेली वाढ कायमस्वरूपी टिकणार की वातावरण निवळल्यानंतर पुन्हा कपात होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### उद्योगमंत्र्यांच्या आदेशालानंतरही कपात



एमआयडीसीकडून मिरा-भाईंदरसाठी १२५ दशलक्ष लिटर पाणी मंजूर आहे; परंतु शहराला ११० दशलक्ष लिटर पाणीच दिले जात होते. डिसेंबर महिन्यात शहराला पाच दशलक्ष लिटर पाणी वाढवून देण्याचे आदेश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले होते. या आदेशानंतर सुमारे तीन महिने पाणीपुरवठ्यात वाढ झाली. मात्र त्यानंतर एमआयडीसीने पुन्हा पाणी कपात करून ती दैनंदिन १०७ ते १०८ दशलक्ष लिटर पुरवठ्यावर आणली.

### १२ ते १४ दशलक्ष लिटर कमी पुरवठा



स्टेमकडून ८६ दशलक्ष लिटर पाणी मंजूर असताना मिरा-भाईंदरला ७२ ते ७४ दशलक्ष लिटर पाणीच दिले जात होते. मिरा-भाईंदर महापालिकेच्या चेणा येथील मीटर नोंदीनुसार हे सिद्ध झाले होते.

### ऐन उन्हाळ्यात नागरिकांना दिलासा

आता स्टेम प्राधिकरणाकडून ७८ ते ७९ दशलक्ष लिटर व एमआयडीसीकडून ११५ दशलक्ष लिटर पाणी दिले जात आहे, अशी माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

लोकसत्ता पा. नं. ८

# ‘खटल्यासाठी मंजुरी मिळवणे तपासाचा भाग नाही’

**सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा**

**पीटीआय, नवी दिल्ली**

**खटला भरण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी मिळवणे हा तपासाचा भाग नाही. ठरलेल्या मुदतीत आरोपपत्र दाखल करण्यात** आले असेल, तर अशाप्रकारची मंजुरी न मिळाल्याच्या आधारावर आपसूकच जामीन मिळण्याचा हक्क असल्याचा दावा आरोपी करू शकत नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला.

एखाद्या कायद्यानुसार मंजुरी आवश्यक आहे अथवा नाही हा गुन्ह्याची दखल घेण्याच्या वेळी विचारात घेतला जावयाचा मुद्दा आहे, चौकशीदरम्यान किंवा तपासादरम्यान विचार करण्याचा नाही, असे सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड व न्या. जे.बी. पारडीवाला यांच्या खंडपीठाने सांगितले.

संबंधित अधिकारी मंजुरीसाठी काही वेळ घेत असेल, तर त्यामुळे तपास यंत्रणेने न्यायालयात सादर केलेल्या अंतिम अहवालावर विपरीत परिणाम होत नाही. सक्षम अधिकाऱ्याकडून मंजुरी मिळवणे हा तपासाचा भाग आहे असेही म्हणता येत नाही. मंजुरीशिवाय दाखल करण्यात आलेले आरोपपत्र म्हणजे अपुरे आरोपपत्र आहे, हा युक्तिवाद मान्य करता येणार नाही, असे न्यायालय म्हणाले.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु. पा. नं. १

# नोकरभरतीत निराशा

## वसई-विरार महानगरपालिकेच्या नोकरभरतीचे कंत्राट खासगी कंपनीला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या 'क' आणि 'ड' वर्गातील १ हजार २८ जागांसाठी भरती केली जाणार आहे. भरती प्रक्रियेचे हे काम टाटा कन्स्लटन्सी सर्व्हिसेस या खासगी कंपनीकडे देण्यात आले आहे. या नोकरभरतीत स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार नसल्याचे तसेच कार्यरत ठेका कर्मचाऱ्यांना सामावून घेतले जाणार नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. यामुळे अनेक वर्षांपासून आशेवर असलेल्या हजारो तरुणांची निराशा झाली आहे.

२००९ साली शहरातील ४ नगर परिषदा आणि ग्रामपंचायतींचे विलीनीकरण होऊन वसई-विरार महापालिकेची स्थापना झाली होती. तेव्हापासून पालिकेत सरळ सेवेत भरती प्रक्रिया झालेली नव्हती. २०१४ साली पालिकेचा आकृतीबंध मंजूर झाला. त्यानुसार दोन हजार ८५३ पदे मंजूर होती. यापैकी २७ अधिकाऱ्यांची पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यात आली होती. उर्वरित पदांसाठी भरती केली जाणार आहे. नोकर भरती प्रक्रिया राबविण्यासाठी शासनाने टीसीएस आणि आयबीपीएस (इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शन) या दोन एजन्सीची नियुक्ती केली आहे. पालिकेने टीसीएस कंपनीमार्फत नोकरभरती करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व करार पूर्ण झाला असून लवकरच ही नोकर भरती प्रक्रिया जाहीर केली जाणार आहे.

### स्थानिकांना संधी नाहीच

वसई-विरार महापालिकेच्या नोकर भरतीत स्थानिकांसाठी कुठल्याही प्रकारचे प्राधान्य ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे स्थानिकांना नोकर भरतीसाठी आरक्षण देता येणार नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. भरती प्रक्रियेबाबत शासनाचे धोरण असून ती सर्वांसाठी खुली असणार आहे. त्यामुळे स्थानिकांना आरक्षण नसेल किंवा ठेका कर्मचाऱ्यांनाही सामावून घेण्याची तरतूद नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. वसई-विरार महापालिकेत केवळ २० टक्के कर्मचारी कायम असून ८० टक्के कर्मचारी हे ठेका पद्धतीने काम करतात. हे ठेका कर्मचारी ५ ते १५ वर्षांपासून पालिकेत कार्यरत आहेत. या निर्णयामुळे स्थानिकांची निराशा झाली आहे.

### 'पालिका आमची, कर्मचारी बाहेरचे'

वसई-विरार महापालिका ही स्थानिकांसाठी असली तर यातील कर्मचारी बाहेरचे असणार आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित काम होणार नाही तसेच भ्रष्टचार होईल, अशी टीका ज्येष्ठ कामगार नेते मार्कुस डाबरे यांनी केली. पालिका आमची पण कर्मचारी बाहेरचे ही मोठी विसंगती आहे, असेही ते म्हणाले. माजी सभापती आणि बहुजन विकास आघाडीचे नेते नीलेश देशमुख यांनी देखील नाराजी व्यक्त केली आहे. नोकर भरतीत स्थानिकांना प्राधान्य द्या ही आमदार हितेंद्र ठाकूर यांची पहिल्यापासून भूमिका आहे. ज्या शहरासाठी महापालिका काम करणार त्या शहरातील कर्मचाऱ्यांना प्राधान्य नसणे ही खेदाची बाब आहे. शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करावा आणि स्थानिकांना नोकर भरतीत प्राधान्य द्यावे अशी मागणी त्यांनी केली.

लोकसत्ता पु. पा. नं. १

# नालासोपारा सेंट्रल पार्कच्या अनधिकृत फेरीवाल्यांना अभय

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**वसई –** वसई-विरार महापालिकेने शहरातील फेरीवाल्यांविरोधात कारवाई सुरू केली असली तरी नालासोपारा पूर्वेच्या सेंट्रल पार्क येथील बेकायदेशीर फेरीवाल्यांना अभय दिले आहे. फेरीवाला माफियांकडून या फेरीवाला बाजारात लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असल्याचा आरोप आहे.

वसई विरार शहरात ठिकठिकाणी बेकायदेशीरपणे फेरीवाले बसविण्यात येतात. फेरीवाला माफिया या फेरीवाल्यांकडून हप्ते घेऊन बाजार सुरू ठेवातात. अनेक ठिकाणी आठवडी बाजारदेखील भरविण्यात येत आहेत. यामुळे वाहतूक कोंडी, अस्वच्छता, अतिक्रमण आदी अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या अनधिकृत बाजारांविरोधात सातत्याने पालिकेकडे तक्रारी करण्यात येत आहेत. पालिकेने मागील आठवड्यापासून या फेरीवाल्यांविरोधात कारावाई सुरू केली आहे. मात्र नालासोपारा पूर्वेला असलेल्या सेंट्रल पार्क परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यात आलेली नाही. या बाजारात अनेक लहान- मोठे फेरीवाले बसविण्यात आले आहे. त्यांच्याकडून या परिसरातील फेरीवाला माफिया दैनंदिन हप्ते घेत असतो. एका पक्षाशी संबंधित व्यक्तीच्या आशीर्वादाने हा बाजार राजरोसपणे सुरू आहे. तुळिंज पोलीस ठाण्यापासून हा फेरीवाल्यांचा अनधिकृत बाजार सुरू होतो. महिन्याला लाखो रुपयांची वसुली केली जात असते.

शहरातील इतर अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई सुरू असताना या सेंट्रल पार्कमधील अनधिकृत फेरीवाल्यांना अभय का, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. या अनधिकृत फेरीवाला बाजारावर कारवाई करून नागरिकांची त्रासापासून सुटका करावी, परिसर मोकळा करावा अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

CS CamScanner
Scanned with CamScanner

सामना पान नं. ८

# अनधिकृत शाळा आढळल्यास संस्थाचालकांना एक लाखाचा दंड

## मीरा-भाईंदरमध्ये बोगस शाळांच्या शोधासाठी पाच पथके

भाईंदर, दि. १ (सा.वा.) – जून महिना उजाडला की पूर्व प्राथमिक, प्राथमिक शाळेत मुलांना प्रवेश घेण्यासाठी पालकांची एकच झुंबड उडते. सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी पालकांचा ओढा अधिक आहे. मात्र धक्कादायक बाब म्हणजे मीरा–भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात इंग्रजी माध्यमाच्या अनेक शाळा अनधिकृतपणे सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रात शहरातील बेकायदा शाळांचा बाजार उठवण्यासाठी पालिकेने कंबर कसली आहे. पालिकेच्या शिक्षण विभागाने बोगस शाळांचा शोध सुरू केला असून अनधिकृत शाळा आढळल्यास संस्थाचालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबरोबरच एक लाखाचा दंड ठोठावला जाणार आहे; यासाठी पालिकेने पाच पथके तयार केली आहेत.



१५ जूनपासून शाळा सुरू होत आहेत. यापार्श्वभूमीवर अनधिकृत शाळेत प्रवेश घेतल्यास मुलांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस प्रशासन जबाबदार राहणार नाही, असा इशारा महापालिकेने पालकांना दिला आहे. मीरा–भाईंदर शहरात महापालिकेच्या ३६ शाळा आहेत तर खासगी व अनुदानित अशा ३७० नोंदणीकृत शाळा आहेत. या व्यतिरिक्त अनधिकृत शाळांचा शोध घेण्यासाठी पालिकेने पाच पथके तयार केली आहेत. शिक्षण विभागाच्या पथकांनी अनधिकृत शाळांना शोधून काढण्यासाठी परिसर निहाय सर्वेक्षण सुरू केले आहे. बेकायदा शाळांना तत्काळ टाळे ठोकण्याचे आदेश शिक्षणाधिकारी सोनाली मातेकर यांनी या पथकाला दिले आहेत. याशिवाय बोगस संस्थाचालकाला एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्याबरोबरच त्याच्यावर फौजदारी गुन्हाही दाखल केला जाणार आहे.

### इथे करा संपर्क

इंग्रजी माध्यमात नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनिअर केजीमध्ये प्रवेश घेण्यासाठी सध्या पालकांची धावपळ सुरू आहे. मुलांचा प्रवेश निश्चित करताना पालक संबंधित शाळा अधिकृत की अनधिकृत हे पाहण्याचीही खबरदारी घेत नाहीत. त्यामुळे अनधिकृत शाळेसंबंधी माहिती असल्यास ०२२- २८१४९०४२ या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहनही मातेकर यांनी केले आहे.

सामना पा. नं. ८

पैशांची हाव महागात पडली

# भाईंदरमधील स्टील व्यापाऱ्याला ३० लाखांचा चुना

भाईंदर, दि. १ (सा.वा.) – भाईंदर येथे राहणाऱ्या स्टील व्यापाऱ्याला पैसे डबल करून देण्याचे आमिष दाखवून ३० लाख रुपयांचा चुना लावण्यात आला आहे. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यातील एका अटक केली आहे. त्यामुळे डबल पैशांची हाव या व्यापाऱ्याला चांगलीच महागात पडली आहे.

भाईंदर पश्चिम येथे राहणारे रवि मेहता (४५) हे स्टील व्यापारी व जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्या जमीन खरेदी विक्री व्यवसायामध्ये जमिनीच्या कागदपत्रांचे काम भूषण मांडवकर हा पाहतो. भूषण याने मेहता यांना सांगितले की त्याच्या मित्राने एक स्कीम सांगितली असून ती चांगली आहे. त्या स्कीममध्ये पहिल्यादा ५ लाख रुपये द्यायचे. नंतर हे पैसे स्पेन देशाचे वॉलेट ओपन करून त्यामध्ये 'पे बाय नियर वॉलेट'मध्ये गुंतवणूक केले जातात. तसेच २५ लाख त्यांना कॅश द्यावी लागते. त्याबदल्यात ते दुसऱ्या दिवशी ५४ लाख रुपये आपल्याला देणार आहेत. मेहता यांना ही स्कीम आवडल्यामुळे त्यांनी भूषण याच्या मित्रांना भेटण्यास बोलावले. भूषण मांडवकर, संतोष धुलप, विकास घाटाळ, करण रझोश ऊर्फ सोनू, राहुल गायकवाड यांनी मेहता यांना स्कीम सांगून पैसे घेऊन पोबारा केला. मात्र या प्रकरणात फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तक्रार दिली. याप्रकरणी करण रझोश याला अटक केली आहे.

CS CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पु.पा.न. ५

# गेल्या १० वर्षांपासून न्यायालय सुरु करण्याकरिता वकिलांची बैठक

## बैठकीत अधिवक्ता संरक्षण विधेयक मंजूर करून सरकारकडे पाठविण्याचा निर्णय

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदरमध्ये गेल्या १० वर्षांपासून दिवाणी व सत्र न्यायालयाचे काम सुरु असून ते अद्याप सुरु होऊ शकलेले नाही. कासवगतीने सुरु असलेल्या न्यायालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून ते सुरु करण्याच्या उद्देशाने सोमवारी ऍडव्होकेटस् वेल्फेयर असोशिएशनने सोमवारी मीरारोड येथील ब्लु मून क्लबमध्ये बैठकीचें आयोजन केले होते. त्यात असोसिएशनच्या माध्यमातून अधिवक्ता संरक्षण विधेयक सर्वानुमते मंजूर करून सरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

पालिकेच्या शहर विकास आराखड्यातील तरतुदीनुसार मीरारोड येथील हाटकेश परिसरात न्यायालयासाठी आरक्षित असलेल्या जागेत २०१३ मध्ये तीन मजली दिवाणी व सत्र न्यायालयाच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली. मात्र त्याचे बांधकाम पुरेशा निधीअभावी सतत रखडल्याने गेल्या १० वर्षांत केवळ न्यायालयाची इमारतच उभी करण्यात आली. तर इमारतीच्या अंतर्गत सजावटीसह इतर आवश्यक बांधकामे अद्याप सुरूच झालेली नाहीत. कासवगतीने बांधकाम सुरु असल्याने न्यायालय सुरू होण्याची तारीख पुढे ढकलली जात असल्याचा आरोप ऍडव्होकेटस् वेलफेयर असोसिएशनने केला आहे.

गेल्या १० वर्षांनंतरही बांधकाम सुरु न झाल्याने असोसिएशनने मीरारोडच्या ब्लु मून क्लबमध्ये शहरातील सर्व वकिलांची बैठक आयोजित करून न्यायालय सुरु करण्याबाबत चर्चा केली. सध्या न्यायालयीन प्रक्रियेसाठी मिरा-भाईंदर शहरातील वकिलांना शहरापासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावरील ठाणे येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जावे लागते. यात वकिलांसह लोकांचा वेळ, इंधन व पैसे वाया जातो. यात बचत होऊन स्थानिक पातळीवरील खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी मीरारोड येथील न्यायालय लवकरात लवकर सुरु होणे अपेक्षित असल्याचे मत वकिलांकडून व्यक्त करण्यात आले.

यासह दिल्लीच्या साकेत न्यायालयात झालेल्या हत्येची आठवण करून देत वकिलांच्या सुरक्षिततेचा तसेच सन्मानाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. हे न्यायालय सुरु करण्यास प्रशासकीय समन्वयाचा अभाव असल्याचा आरोप करण्यात आला. हे न्यायालयात जिल्हास्तरीय नव्हे तर दिवाणी व फौजदारी खटल्यांसाठी कनिष्ठ विभागीय दंडाधिकारी दर्जाचे असल्याचा दावा यावेळी करण्यात आला. मात्र मिरा-भाईंदर शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या आधारावर वरीष्ठ स्तरावरील न्यायालय, जिल्हा तसेच सत्र न्यायालयाची गरज असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.



### खटले निकाली काढण्यात विलंब

सध्या शहरात कनिष्ठ विभाग न्यायदंडाधिकारी न्यायालय सुरू होणार असल्याने वकिलांच्या अडचणीत वाढ होऊन काही प्रकरणांसाठी त्यांना मिरा-भाईंदर येथील दिवाणी व सत्र न्यायालयात तर काही प्रकरणांसाठी ठाणे येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जावे लागणार आहे. अशा परिस्थितीत वकिलांचे आरोग्य, सुरक्षितता व उपस्थितीमध्ये अडथळे निर्माण होऊन खटले निकाली काढण्यात विलंब होणार असल्याचे सांगण्यात आले. त्याचा फटका सामान्य लोकांना बसणार असल्याचा दावा करण्यात आला.

### वकिलांनी गतवेळी छेडले होते आंदोलन

हे न्यायालय सुरु करण्यास विलंब होत असल्याविरोधात असोसिएशनच्या माध्यमातून वकिलांनी गतवेळी आंदोलन छेडले होते. त्यानंतर न्यायालयाचे काम सुरू करण्यात आले. मात्र ते अतिशय संथगतीने होत असल्याबाबत वकिलांनी नाराजी व्यक्त केली. हे न्यायालय लवकरात लवकर सुरु होण्यासाठी वकिलांनी असोसिएशनच्या माध्यमातून अधिवक्ता संरक्षण विधेयक सर्वानुमते मंजूर करून सरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेतला. बैठकीत असोशिएशनचे अध्यक्ष ऍड. एच.आर. शर्मा, उपसचिव करणी विश्वास, खजिनदार धर्मेंद्र पटेल आदींसह शहरातील वकील उपस्थित होते.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. नं. १

# निवडणुका घेऊन दाखवाच!

## मुंबईतील 'वज्रमूठ सभे'त उद्धव ठाकरे यांचे भाजपला आव्हान

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** महाविकास आघाडीची वज्रमूठ भक्कम असून मुंबई महापालिकाच काय, अगदी लोकसभा-विधानसभा निवडणुका घेण्याची हिंमत दाखवा. सर्व निवडणुकांमध्ये तुमचा पराभव करुन जमीन काय असते ते दाखवून देऊ, असे खुले आव्हान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी भाजपला दिले. देशाला सर्वाधिक महसूल मिळवून देणाऱ्या मुंबईच्या ठेवींवर भाजपचा डोळा असून, त्यांना शहराची मोडतोड करायची आहे. शिंदे सरकार हे निमूटपणे बघत आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे तुकडे केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

महाविकास आघाडीची तिसरी वज्रमूठ सभा वांद्रे-कुर्ला संकुलात पार पडली. या सभेत ठाकरे यांनी भाजपचा खरपूस समाचार घेतला. मुंबई आंदण मिळालेली नसून ती मराठी माणसाने लढून मिळविली आहे. त्यामुळेच गद्दारी करुन का होईना तुम्हाला राज्याचे मुख्यमंत्री होता आले. त्यामुळे मिंधे होऊन मुंबईवरील अत्याचार सहन करु नका, असा इशारा ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला.



> केंद्रातील मांडवली प्रवृत्तीचे सरकार मुंबई गिळंकृत करण्याचा प्रयत्न करीत असून येथील उद्योग, मोठ्या कंपन्यांची कार्यालये गुजरातमध्ये हलविली जात आहेत. महापालिकेतील कोट्यवधी रुपयांच्या ठेवीवर त्यांचा डोळा असून त्यामुळेच मुंबई आणि महाराष्ट्राला कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> **- उद्धव ठाकरे**, पक्षप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

### ६ तारखेला बारसू दौरा

स्थानिक जनतेच्या सहमतीशिवाय बारसू प्रकल्प होऊ देणार नाही, असा इशारा ठाकरे यांनी दिला. प्रकल्पाची जागा निश्चित केल्याचा आरोप पत्राच्या आधारे केला जातो आहे. मात्र पत्रात लोकांवर अत्याचार करुन प्रकल्प उभारा असे आम्ही म्हटले नव्हते, हे सांगतानाच बारसू ग्रामस्थांचे म्हणणे ऐकण्यासाठी येत्या ६ तारखेला नाणारला भेट देणार असल्याचे ठाकरे यांनी जाहीर केले. बारसूला जाण्यापासून आपल्याला रोखण्याचा सरकारने प्रयत्न करु नये, असा इशाराही त्यांनी दिला. मी शरद पवारांच्या दबावाखाली काम करतो, अशी टीका केली. पण उदय सामंत शरद पवारांचे मार्गदर्शन घेतात ते कसे चालते, असा सवालही ठाकरे यांनी केला.

मुख्यमंत्री अन् घोटाळे हे समीकरणच – अजित पवार / पान ४

त्यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे हिंदुत्व, गृहमंत्री अमित शहा यांच्यावर चौफेर टीका केली. काँग्रेसने ९१ वेळा आपल्याला शिव्या दिल्या असा आरोप पंतप्रधान मोदी करीत आहेत. पण त्याच्याच पक्षातील काही लोक आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन लक्ष्य करीत आहेत. त्यांच्याबद्दल मोदी का बोलत नाहीत, असा सवाल ठाकरे यांनी केला.

पूर्वी कधीही केले जात नव्हते असे सूडाचे राजकारण आता सुरु आहे. आपल्या (पान ४ वर)

CamScanner
Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. न. 1

## घटनेतील अनुच्छेद १४२(१)च्या वापरावर घटनापीठाचे शिक्कामोर्तब

# थेट घटस्फोट देण्याचा सर्वोच्च न्यायालयाला अधिकार

**पीटीआय, नवी दिल्ली**

पती-पत्नीचे नाते पुन्हा प्रस्थापित करणे अशक्य असल्याच्या कारणावरून विवाहविच्छेद करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालय करू शकते. राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२(१) अन्वये मिळालेल्या अंगभूत अधिकारानुसार सर्वोच्च न्यायालय हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील अनिवार्य अशा सहा महिने प्रतीक्षा कालावधीची प्रतीक्षा न करताही परस्पर सहमतीने घटस्फोट मंजूर करू शकते, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला.

अनुच्छेद १४२ हा सर्वोच्च न्यायालयापुढे आलेल्या कोणत्याही प्रकरणात संपूर्ण न्याय करण्यासाठी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याशी संबंधित आहे. अनुच्छेद १४२(१) नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी किंवा अन्य प्रकरणांत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी संपूर्ण देशभरात केली जाते. हिंदू विवाह कायद्याचे कलम १३-ब हे परस्पर सहमतीने घटस्फोट मंजूर करण्यासंबंधी आहे. यातील उपकलम २ नुसार घटस्फोटासाठीच्या पहिल्या संयुक्त अर्जाला मंजुरी मिळाल्यानंतर सहा महिने ते १८ महिने या कालावधीत हा अर्ज मागे घेतला गेला नाही तर, पक्षकारांना दुसऱ्यांदा अर्ज करावा लागतो. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. एस. के. कौल यांच्या नेतृत्वाखालील पाच सदस्यीय घटनापीठाने म्हटले आहे की, पती-पत्नीचे नाते पुन्हा प्रस्थापित होणे अशक्य झाल्याच्या स्थितीत सर्वोच्च न्यायालयाने घटस्फोट मंजूर करणे हा अधिकाराचा भाग नाही, तर तो स्वयंनिर्णयाचा (पान ८ वर)

### ‘थेट आमच्याकडे येऊ नका’

संबंधित निकाल देताना घटस्फोटासाठी लढणाऱ्या जोडप्यांनी नाते पुन्हा प्रस्थापित करणे अशक्य असल्याच्या कारणावरुन थेट आमच्याकडे रिट याचिका करू शकत नाहीत, असेही घटनापीठाने स्पष्ट केले. अनुच्छेद ३२ अनुसार थेट सर्वोच्च न्यायालयात किंवा अनुच्छेद २२६ अनुसार उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका करता येणार नाही, असे न्यायालयाने सांगितले.



### मोडलेल्या विवाहबंधांचे निदर्शक

**सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात पुन्हा प्रस्थापित न होऊ शकणाऱ्या नात्यांचे काही निदर्शक अधोरेखित केले आहेत. हे निदर्शक असे...**

- विवाहानंतर जोडप्याने एकत्रित घालविलेला कालावधी
- दोघे विभक्त राहिलेला कालावधी
- पती किंवा पत्नीने परस्परांविरोधात आणि कुटुंबीयांविरोधात केलेल्या आरोपांचे स्वरूप
- वेळोवेळी न्यायालयांनी दिलेले आदेश आणि त्यांचा वैयक्तिक संबंधांवर परिणाम
- वाद सोडविण्यासाठी न्यायालयाच्या मध्यस्थांमार्फत झालेले प्रयत्न
- विभक्त राहिल्याचा कालावधी मोठा असावा आणि सहा वर्षांपेक्षा जास्त काळ हा महत्त्वाचा घटक आहे.

---

## थेट घटस्फोट देण्याचा सर्वोच्च न्यायालयाला अधिकार

*(पान १ वरून)*

भाग असून त्याचा वापर अत्यंत काळजीपूर्वक केला पाहिजे. यासाठी संबंधित सर्व बाजूंचा विचार करून उभय पक्षकारांना संपूर्ण न्याय मिळेल याची दक्षता घेतली पाहिजे.

विवाह वाचविणे शक्य नसते, त्या स्थितीत जोडप्यापैकी एकाने विवाहविच्छेदाला विरोध केला तरी, सर्वोच्च न्यायालय अनुच्छेद १४२(१) मधील अधिकारानुसार घटस्फोट मंजूर करू शकते काय, असा मुद्दा घटनापीठापुढे होता. घटनापीठ म्हणाले की, याचे होकारार्थी उत्तर याच अनुच्छेदात मिळते. या घटनापीठात न्या. संजीव खन्ना, ए. एस. ओक, विक्रम नाथ आणि न्या. जे. के. महेश्वरी यांचाही समावेश आहे.

सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, हिंदू विवाह कायद्याचे कलम १३-ब हे पती-पत्नीच्या संयुक्त अर्जानुसार परस्पर सहमतीने घटस्फोट मंजूर करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारात कोणतीही आडकाठी आणत नाही. जेव्हा या कलमातील आवश्यक बाबींची पूर्तता होते आणि संबंधित घटक पूरक असतात, तसेच घटस्फोट मंजूर केला जावा असे न्यायालयाचे मत बनते, तेव्हा घटस्फोट दिला पाहिजे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दैनिक दबंग दुनिया

# मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय की ओर से महाराष्ट्र दिवस समारोह

**वसई।** 1 मई 2023 को महाराष्ट्र दिवस के अवसर पर मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय ने पुलिस आयुक्त कार्यालय में ध्वजारोहण किया और राष्ट्रीय ध्वज को सलामी दी। ध्वजारोहण समारोह के दौरान पुलिस आयुक्त मधुकर पाण्डेय ने महाराष्ट्र दिवस पर उपस्थित पुलिस अधिकारियों एवं कर्मचारियों को



बधाई दी। उक्त कार्यक्रम के दौरान पुलिस महानिदेशक,महाराष्ट्र राज्य,मुंबई से पुलिस महासंचालक सम्मानचिन्ह 2022 से सम्मानित मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र 1).वरिष्ठ पुलिस निरीक्षक कैलास वसंतराव बर्वे, वालीव पोलीस ठाणे, 2).पुलिस निरीक्षक समीर सुरेश आहेरराव, गुन्हे शाखा,3).पुलिस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर,मांडवी पुलिस स्टेशन 4).पुलिस हवालदार शसंतोष देवराम लांडगे, गुन्हे शाखा, कक्ष 1, काशिमिरा 5). मनोज नारायण मोरे,वालीव पुलिस स्टेशन,6).शशिकांत धनाजी मोरे, सपोआ विरार विभाग कार्यालय,7).सुनिल शांताराम कुडवे,मध्यवर्ती गुन्हे शाखा,8).प्रफुल अंनत पाटील,गुन्हे शाखा,कक्ष 1,काशिमिरा 9). गणेश वसंत जावले,नवघर पुलिस स्टेशन का पुलिस कमिश्नर ने पुष्पगुच्छ देकर सम्मानित किया।

Scanned with CamScanner

# पुलिस आयुक्त ने पुलिस अधिकारियों को किया सम्मानित

**वसई :** 1 मई 2023 को महाराष्ट्र दिवस के अवसर पर मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय ने पुलिस आयुक्त कार्यालय में ध्वजारोहण किया और राष्ट्रीय ध्वज को सलामी दी। ध्वजारोहण समारोह के दौरान पुलिस आयुक्त मधुकर पाण्डेय ने महाराष्ट्र दिवस पर उपस्थित पुलिस अधिकारियों एवं कर्मचारियों को बधाई दी।उक्त



कार्यक्रम के दौरान पुलिस महानिदेशक, महाराष्ट्र राज्य, मुंबई से 'पुलिस महासंचालक' सम्मानचिन्ह 2022 से सम्मानित मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र 1).वरिष्ठ पुलिस निरीक्षक कैलास वसंतराव बर्वे, वालीव पोलीस ठाणे, 2).पुलिस निरीक्षक समीर सुरेश आहेरराव, गुन्हे शाखा, 3).पुलिस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, मांडवी पुलिस स्टेशन 4).पुलिस हवालदार शसंतोष देवराम लांडगे, गुन्हे शाखा, कक्ष 1, काशिमिरा 5). मनोज नारायण मोरे, वालीव पुलिस स्टेशन, 6).शशिकांत धनाजी मोरे, सपोआ विरार विभाग कार्यालय, 7).सुनिल शांताराम कुडवे, मध्यवर्ती गुन्हे शाखा, 8).प्रफुल अंनत पाटील, गुन्हे शाखा, कक्ष 1, काशिमिरा 9). गणेश वसंत जावले, नवघर पुलिस स्टेशन का पुलिस कमिश्नर ने पुष्पगुच्छ देकर सम्मानित किया।

Scanned with CamScanner

THE FREE PRESS JOURNAL
SINCE 1928
www.freepressjournal.in

following delayed renewals of town that they operate in.

# Cops recover jewellery left behind in auto

SURESH GOLANI / Mumbai

Mumbai Police recently recovered a bag full of jewellery worth Rs2.25 lakh that a Mira Road resident had left behind in an auto.

Harvinder Singh's wife Poonam and their two kids hired an auto from Ramdev Park in Mira Road on April 26. They were on their way to the station to catch a train for Punjab. They alighted at the Mira Road station but Poonam left the bag in the auto.

The bag contained gold ornaments worth more than Rs2.25 lakh and Rs7,000 in cash.

Poonam and the children left for Punjab and the next day Harvinder registered a police complaint.

Acrime detection unit led by police personnel Shakil Pathan scanned footage captured by at least 25 CCTV cameras and zeroed in on the auto. The team then traced the driver and recovered the bag. It returned it to its rightful owner on Sunday." Senior Inspector Jitendra Vankoti said.

The auto driver has been charged under Section 403 of the IPC for dishonest misappropriation of property but he has not been arrested.

Scanned with CamScanner

THE FREE PRESS JOURNAL

HIC, HIC, HURRAY!

# Excise wing mops up ₹407cr in revenue

SURESH GOLANI / Mumbai

Cash registers are ringing for the state excise department as the Thane division has collected Rs407.5 crore through annual renewals of licences from retail liquor vending establishments for the current fiscal (2023-24).

As per statistics from the Thane excise division, there are around 7,500 retail liquor vending establishments within its jurisdiction including – Mumbai City, Mumbai Suburbs, Thane, Palghar and Raigad.

As of date, the Thane division has mopped up Rs407.5 crore from 7,246 establishments – including 701 country liquor shops (CL-III), 611 foreign liquor shops (FL-II), 1,814 beer shops (FIBR-II), 4057 permit rooms (FL-III), 45 beer shops (form E) and 18 wine bars (form-E2) – that fall under its jurisdiction.

Non-renewal of licences in due time has resulted in short recovery of fees to tune of Rs15 crore. However, the collection may have witnessed a marginal increase following delayed renewals



and payment of licence fees in the government treasury after the stipulated deadline of April 1, said a senior excise officer.

This apart from revenue generation towards late fees, transfers and shifting charges. After an average hike of 15% in licence fees announced by the state government in accordance to rules of the Maharashtra Potable Liquor (Periodicity and Fees for Grant, Renewal or Continuance of License) Rules, 1996, a fresh gazette notification was recently released reducing these licence fees by 5%.

The fees for liquor retailers are based on the population of the city, village or town that they operate in.

Scanned with CamScanner

लोकमत

# नायगांवमध्ये नऊ बेकायदा शाळांवर गुन्हा दाखल

## जि.प. शिक्षण अधिकाऱ्यांनी केली तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नायगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी सुरू असलेल्या बेकायदा शाळांवर शनिवारी रात्री गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वसई-विरार परिसरातील वाढती लोकसंख्या पाहता या परिसरात शाळामाफियांकडून मोठ्या प्रमाणात बेकायदा शाळा सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्हा परिषद शिक्षण अधिकाऱ्यांनी ९ बेकायदा शाळांवर गुन्हा दाखल केला आहे.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून, जिल्हा परिषद व खासगी शाळांची पटसंख्या कमी असल्याने शालेय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांचे नातेवाईक त्यांना त्यांच्या निवासी भागाजवळील खासगी शाळांमध्ये प्रवेश घेतात. शाळा चालविण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षक विभागाची परवानगी घ्यावी लागते. मात्र, वसई-विरार महापालिका क्षेत्रात अशा शेकडो शाळा बेकायदेशीरपणे चालविल्या जात आहेत. अशा अनेक शाळांना जिल्हा परिषद शिक्षक विभागाकडून लेखी नोटीस बजावून बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु, कोणत्याही शाळेने आवश्यक कागदपत्रे दिलेल्या मुदतीत सादर केली नाहीत.




नायगाव पोलिस ठाण्यांतर्गत कामण परिसरात सुरू असलेल्या ९ शाळांची तपासणी जिल्हा परिषदेचे शिक्षक विभाग अधिकारी देवल्य दशमा डाबरे (५७) यांनी केली. सर्व ९ शाळा बेकायदेशीर आढळल्या, एकाही शाळेकडे आवश्यक कागदपत्रे नाहीत. यामुळे या सर्वांविरुद्ध नायगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी लॉर्ड्स इंग्लिश मीडियम स्कूलचे मालक राकेश गौर, चिल्ड्रन वेल्फेअरचे मिर्झा, गॉड्स वेल्सचे संतोष पटेल, सेंट झेवियर्स अँण्ड कॉन्व्हेंट स्कूलचे अजय यादव, कुन्नेमारी पब्लिक स्कूलचे मुनीत विश्वकर्मा, स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या जस्मिन इजराईत, विवेकानंद विद्यालयाचे मालक जस्मिन इजराईत यांना अटक केली. शांतीनिकेतन विद्यालयाचे शिंदे या मालकावर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.



Scanned with CamScanner